# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- १५/१०/२०२६**

## मा. स्थायी समिती सभा
## सभा सुचना क्र. ११

**प्रति,**
**सन्मा. श्री. / श्रीमती** ------------------------------------------------------------------

**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १९/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ११ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १९/१०/२०२६ सभा सुचना क्र. ११ विषयपत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
|---|---|
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत — निरंक** |
| --- | **आयुक्तांकडील कामकाज —** |
| १४० | भाईंदर पश्चिम गावदेवी मार्ग (श्री. दुर्गा पराडकर भवन को.ऑ.हौ.सौ.लि. समोरील रस्ता) या रस्त्याची रुंदी १२ मीटर निश्चित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० नुसार मान्यता देणे. |
| १४१ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० अन्वये रस्त्याची रेषा विहीत करणेस मान्यता देणे. |
| १४२ | उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio-Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामी प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणुक करणे याकामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| १४३ | घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या २.५ CNG Hopper Tipper Dumper mounted on vehicles वार्ड साफसफाई कामी नियुक्त कंत्राटदारास दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी देणेस व सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| १४४ | मनपा क्रीडा विभाग अंतर्गत कार्यरत क्रीडा शिक्षक यांना मुदतवाढ मिळणेबाबत. |
| १४५ | महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना वॉटर बॉटलचा (स्टेनलेस स्टील) पुरवठा करणेबाबत ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. |
| १४६ | J P INFRA FOUNDATION मार्फत नवघर शाळा संकुलातील महानगरपालिका शाळांमध्ये विकास प्रकल्प राबवणे. |
| १४७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात सेवाकरार पध्दतीने कार्यरत श्री. व्ही.आर.देशमुख, सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) यांच्या मुदतीचे नवीकरण करणेबाबत. |
| १४८ | आरक्षण क्र. २३० येथील धम्म सम्राट अशोक विध्द विहार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन (दसरा) कार्यक्रमासाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्याबाबत. |
| १४९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालय दुरुस्ती करणे. (पॅनल पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. |
| १५० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध वाहतुक सिग्नल यंत्रणा द्विवार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) (पॅनल पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. |
| १५१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ मधील राजा शिवाजी विद्यालय शेजारील जागेत शौचालय बांधणे. (आमदार निधी) निविदेस मान्यता देणेबाबत. |
| १५२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सार्व. इमारतीमधील सोलार पॉवर प्लांट द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. |
| १५३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तन डंपीग ग्राऊंड येथे पाण्याच्या बोअरवेल पंपाकरीता विद्युत पुरवठा करणे कामाचे अवलोकन करणे. |
| १५४ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ग्रंथालय व अभ्यासिकेकरीता वाचनालय विकास / अभ्यासिका फर्निचर दुरुस्ती करणेबाबत. |

**दिनांक :- १५/१०/२०२६**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. १९/१०/२०२६

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. (१४०)** भाईंदर पश्चिम गावदेवी मार्ग (श्री. दुर्गा पराडकर भवन को.ऑ.हौ.सो. लि. समोरील रस्ता) या रस्त्याची रुंदी 12 मीटर निश्चित करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 210 नुसार मान्यता देणे.

**संदर्भ :-**
1) श्री दुर्गा पराडकर भवन को. ऑप. हौ. सो. (मर्यादित) यांचे दि. 12/08/2025 रोजीचे पत्र.
2) शासन पत्र क्र.एमआरडी-2025/मुमंस-253/नवि-7 दि. 17/09/2025 अन्वये बैठकीचे इतिवृत.
3) मा.ना.श्री. गणेश नाईक, मंत्री (वने) यांनी दि. 15/11/2025 रोजी आयोजित केलेला जनता दरबार.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील श्री दुर्गा पराडकर भवन को.ऑ.हौ.सो. यांनी गृहसंकुलनाच्या समोरील 9.0 मी. रुंद रस्त्याची रुंदी वाढविणेबाबत संदर्भिय क्र.1 दि. 12/08/2025 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

शासनाकडील संदर्भाधीन क्र.2 अन्वयेच्या पत्रातील दि.16/07/2025 रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तांनुसार 9.0 मी. रुंद रस्त्यावर धोकादायक इमारतीचा पुनर्विकास करणेच्या अनुषंगाने UDCPR नियमावलीनुसार 24.0 मी. पेक्षा जास्त उंची अनुज्ञेय होत नाही. त्यामुळे आवश्यक तर 9.0 मी. रुंदीचे रस्त्याचे पुढील सामासिक अंतर विचारात घेवून 12.0 मी. प्रमाणे रस्ते रुंदीकरणाची कार्यवाही महानगरपालिकेस करता येवू शकेल. तसेच मा.ना.श्री. गणेश नाईक, मंत्री (वने) यांनी दि.15/11/2025 रोजी आयोजित केलेल्या जनता दरबारामध्ये मे. दुर्गा पराडकर भवन को.ऑ.हौ.सो.लि., यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर 9.00 मी. रस्ता 12.00 मी. रुंद करणेबाबतची कार्यवाही महानगरपालिकेने करणेबाबत मा.ना.श्री. गणेश नाईक, मंत्री (वने) यांनी निर्देश दिले आहेत.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती व पुनर्विकासा संबंधित अडचणी विचारात घेता तसेच शासनाकडील दि. 16/07/2025 रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तानुसार भाईंदर (प.) येथील मे. एम. बी. राणे, खाजगी सर्व्हेअर यांच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अे ते बी, बी ते सी, सी ते डी व सी ते ई पर्यंतचा रस्ता महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून अंतिम करुन त्यानुसार सदर 9.0 मी. रुंदीचा रस्ता

रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस 6.0 मी. प्रमाणे केल्यास 9.0 मी. रुंदीचे रस्ते 12.0 मी. रुंदीप्रमाणे उपलब्ध होवू शकेल. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याची रुंदी अंतिम रेषा निश्चित करणेची पुढील सर्व वैधानिक कार्यवाही करणेच्या अनुषंगाने सदर रस्त्याने बाधीत जागामालक / इमारतीधारक यांना स्वतंत्रपणे नोटीसा देवून त्यावर सुनावणी घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही कार्यवाही महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून करणेस, मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर रस्त्याची रुंदी 9 मीटर ऐवजी 12 मीटर ठेवून दोन्ही बाजुतीत रस्त्याच्या रेषा विहीत करण्यासाठी असल्यास वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन 1 महिन्याचा कालावधी देऊन आक्षेप् असल्यास सादर करण्यासाठी कार्यवाही केली होती.

सदर मुदतीत एकही आक्षेप प्राप्त झालेला नाही. तरी सदर रस्त्याची रेषा 12 मीटर एवढी निश्चत करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता देणेस शिफारस आहे.

**दिपक खांबित**
प्र. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ०५/०८/२०२६ वेळ दु. १२.४५ वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ०७ सन २०२६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-08/2026-27/DK/L-05

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १८/१०/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.( १४१)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 210 अन्वये रस्त्याची रेषा विहीत करणेस मान्यता देणे.

मिरा-भाईंदर शहराची मुळ विकास योजना (सन 1997) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम 31(1) अन्वये भागशः दि.14/05/1997 व दि.25/08/2000 च्या अधिसूचन अन्वये मंजूर झाली होती.

मिरा भाईंदर शहराची प्रारुप सुधारीत विकास योजना नामनिर्देशित अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना ठाणे यांनी सर्व वैधानिक कार्यवाही अती ती कलम 30 अन्वये शासनास दि.25/10/2023 अन्वये मंजुरीसाठी सादर करण्यात आली असता सदरची विकास योजना शासनाने अधिसुचना क. टिपीएस-1225/452/प्र.क्र.60/25/एसएम/नवि-12 दि.16/04/2026 रोजी सारभूत स्वरुपाचे बदल (EP) वगळून मंजूर केली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त सुधारीत मंजुर विकास योजनेतील मौजे भाईंदर येथील स.क्र.729 व इतर या शितलनगर गृहसंकुलनाच्या मंजूर रेखांकनातील विद्यमान अंतर्गत सर्व 9:00 मी रुदीचे रस्ते नकाशावर दर्शविल्यानुसार एकत्रितपणे 12,00 मी. रुंद करणे आवश्यक असुन शितलनगर गृहसंकुलाच्या मंजूर रेखांकनामधील अस्तित्वातील जुन्या धोकादायक इमारतीच्या पुर्नविकासास अडचणी येत असल्याने तसेच सदर परिसरामधील पुर्नविकासाच्या अनुषंगाने अनुज्ञेय प्रमाणे होणारे बांधकाम क्षेत्र व त्यानुसार वाढणारी वाहने यांचा विचार करता 9.00 मी. रंद रस्त्यावर वाहतुकीमध्ये वाढ होवून नागरीकाना व वाहनधारकांना वाहतुकीचा त्रास होणार असल्याने सदर परिसरामधील सोसायटीधारक व नागरीकांनी सदर रस्त्याची रुंदी वाढविणेबाबत केलेली विनंती विचारात घेवून 9.00 मी. रुंदीचे रस्ते 12.00 मी. प्रमाणे रुंदीकरण केल्यास वाहतुकीस अडचण येणार नाही तसेच पुनर्विकास परवानगीकामी 12.00 मी. रुंद रस्त्यावर इमारत उंची देखील जास्तीची मिळू शकते. त्यामुळे सदर परिसरामधील इमारतधारक देखील पुर्नविकासासाठी पुढे आल्यास जुन्या इमारतीचा पुनर्विकासाचा भार्ग देखील मोकळा होवू शकेल, जेणेकरून धोकादायक इमारत पडून मनुष्य हानी होणार नाही.

आणि ज्याअर्थी उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून उक्त सुधारीत मंजूर विकास योजनेमधील मौजे भाईंदर येथील स.क्र.729, 732, 733(जुना) या जागेतील शितलनगर गृहसंकुलनाच्या मंजूर रेखांकनातील अंतर्गत विद्यमान रस्त्याची देखभाल / दुरुस्ती ही महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याने सदर विद्यमान सर्व 9.00 मी. रुंदीचे रस्ते रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस 6.00 मी. प्रमाणे रुंदीकरण केल्यास 12.00 मी. प्रमाणे एकत्रित रस्ता मिळू शकतो त्यामुळे वाढीव रस्ता रुंदीकरणानुसार रस्ता प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने मंजुर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 से कलम 210 अन्वये रस्त्त्याची रेषा

विहित करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये मा स्थायी समितीने ठराव क. 185 दि. 29/07/2025 अनावे मंजुरी दिली आहे.

सदर वाढीव रस्ता संरेखाच्या अनुषंगाने त्यामधील बाधित तसेच नागरीकांच्या महीतीसाठी वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. तथापी मुदतीत एक ही सुचना व हरकत प्राप्त झालेली नाही. तरी प्रस्तावानूसार सदर रस्त्याची रेषा 12 मीटर रुंदीची निश्चित करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 210 नूसार मा. स्थायी समितीची मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PC-6/2026-27/DK/SG-1

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १३/०८/२०२६ वेळ स.११.१९
रजिस्टर नोंद अ.क. ८८ वर्ष २०२६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १९ / १० /२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१४२) :- उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio-Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामी प्रकल्प व्यवस्थापकाची नेमणुक करणे याकामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथे जुन्या जमा घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या ९,०९,६३०.२० MT घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio-Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणे कामी संदर्भिय शासन निर्णय क्रमांक:- स्वमअ-२०२२/प्र.क्र.९३/नवि-३४ दि.१० ऑगस्ट, २०२२ अन्वये मान्यता दिलेली होती, त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील आदेश प्रपत्र नमुना क्र.४८, बाब क्र.२१ क्र.मजिप्रा/मु.अ./ठाणे/मिरा भाईंदर महानगरपालिका (Bioremediation Of Legacy Watste)/तांशा-२/५२५ दि.०३/०३/२०२५ रोजी मे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडुन सदर कामास तांत्रिक मान्यता देण्यात आलेली होती व त्यानुसार सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली होती.

त्यानुसार सदर कामी दि.२२/०९/२०२६ रोजी पात्र निविदाधारकांस कार्यादेश देण्यात आलेला असुन त्यांच्यामॉर्फत शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio-Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याच्या कामास सुरवात करण्यात आलेली आहे.

उत्तन येथील प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio-Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार शुल्क प्रदान करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ दि.०४ जुन २०१८ मधील मुद्दा क्र.०३ अन्वये टप्पे खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांर्गत प्रकल्पांसाठी | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकिय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०.७५% (डि.पी.आर-०.५०% + प्रमा- ०.२५%) | ०.५०% (डि.पी.आर-०.३३% + प्रमा- ०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे आदेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६% |
| ३ | प्रकल्पाचे २५% काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७% |
| ४ | प्रकल्पाचे ५०% काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७% |
| ५ | प्रकल्पाचे ७५% काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४०% |
| ६ | प्रकल्पाचे १००% काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४०% |
| | **एकुण** | **३.००%** | **२.००%** |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio - Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामावर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणे आवश्यक आहे. सदर कामी प्रशासकिय ठराव क्र.११ दि.०८/०४/२०२५ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio - Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामावर दैनंदिन देखरेख ठेवणेकरीता श्री. इद्रकांत झा. तांत्रिक प्रमुख एमर्जी साईन आय. आय. टी. मुंबई यांच्यासमवेत झालेल्या बैठकिनुसार प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन काम करण्यास स्वारस्य असल्याचे कळविलेले आहे.

सदर कामी महानगरपालिकेमार्फत शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio - Mining पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे कामाचा डि.पी.आर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडुन तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे व त्यानुसार निविदाधारकांना उपरोक्त कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन नेमणुक करणेकरीता विहित नमुद करण्यात आलेल्या टप्प्यापैंकी (१. प्रकल्पाचे प्रशासकिय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर-०.५०% (डि.पी.आर- ०.३३% + प्रमा- ०.१७%) २. प्रकल्पातील कामाचे आदेश दिल्यानंतर – ०.१६%) वगळुन प्रस्तावित कामाच्या १.३४% शुल्क अदा करण्यात येणार आहे.

सदर कामी मे. आय. आय. टी. पवई यांना मंजुर प्रकल्प रक्कमेच्या १.३४% प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन सल्लागार शुल्क देणेबाबत मान्यता मिळणेस व मंजुर दरात शिल्लक घनकचऱ्यावर (Legacy Waste) बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करुन घेणेकरीता प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन लागणारे शुल्क अदा करणेस मान्यता मिळणेस शिफारस आहे. तसेच वरीलप्रमाणे उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) वर Bio - Mining पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे कामावर देखरेख ठेवणे सोईचे होईल. तरी मे. आय. आय. टी. पवई यांना प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन नेमणुक करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये विना निविदा नेमणुक करणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे. त्यानुसार सदर कामावर होणारा खर्च सन २०२७-२८ या आर्थीक वर्षात होणार आहे.

सदर कामी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या "बायोमायनिंग (मनपा हिस्सा / शासन हिस्सा)" या लेखाशिर्षकाअंतर्गत रु.२३,००,००,०००/- लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षकाअंतर्गत रु.९,०२,०४,४१५/- लक्ष एवढी तरतुद उपलब्ध असुन सदर कामी होणारा खर्च सन

२०२७-२८ या आर्थीक वर्षात होणार असुन सन २०२७-२८ या आर्थिक वर्षामध्ये "बायोमायनिंग (मनपा हिस्सा / शासन हिस्सा)" या लेखार्शिर्षकाअंतर्गत अंर्थसंकल्पिय तरतुद करण्यात येणार आहे.

तरी उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio - Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मे. आय. आय. टी. पवई यांची प्रकल्प व्यवस्थापक म्हणुन विना निविदा नेमणुक करणेस व सदर कामी होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

28/09/26

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

D:\Ghankchra prakalpa vibhag\2026-27\7. GOSHAWARA\मा. स्थायी समिती\3. biomining Consultant.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि.१९/१०/2026
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

**// गोषवारा //**

**प्रकरण :- १४३ घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या 2.5 CNG Hopper Tipper Dumper mounted on vehicles वार्ड साफसफाई कामी नियुक्त कंत्राटदारास दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी देणेस व सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधा विकास योजनेतंर्गत शासन निधीतुन 2.5 CuMt CNG Hopper Tipper Dumper वाहने 10 नग खरेदी करण्यात आलेली आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोन क्र. 01 (प्रभाग समिती क्र. 01, 02, 03) व झोन क्र. 02 (प्रभाग समिती क्र. 04, 05, 06) अंतर्गत येणाऱ्या परिसरातील दैनंदिन रस्ते, पदपथ, सार्वजनिक परिसर व रात्रीच्या वेळी व्यापारी क्षेत्र व बाजार परिसर साफसफाई, महिन्यातून दोन वेळा गटार सफाई करणे आणि मनपा. मालकीच्या 14 CuMt Refuse Compactor, 5 CuMt Garbabe Tipper व 3.3 CuMt तीन कंपार्टमेंट वाहनाद्वारे दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे, संचालन व देखभाल करणेकामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्यासमवेत करारनामा करून कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कंत्राटामध्ये 2.5 CuMt CNG Hopper Tipper Dumper वाहने व सदर वाहनांचे दर सामाविष्ट नाहीत.

वरीलप्रमाणे सदर वाहनांचे दर निश्चित केले नसल्याने 2.5 CuMt CNG Hopper Tipper Dumper वाहनांकरीता आवश्यक बाबींचा विचार करुन (Labour for Vehicle (As per Minimum Wages), CNG Expenses, Maintenance, servicing, washing charges, driver's expense, RTO / Tax / Insurance and other charges, Equipment, safety measures, Uniform and Sweeping Material व Profit) वाहनाचे दर निश्चित करणेकामी महानगरपालिका संकेतस्थळ www.mbmc.gov.in वर दि.25/09/2025 रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करून दि.30/09/2025 रोजी पर्यंत बाजारभावानुसार दरपत्रक मागविण्यात आले. तसेच इतर महानगरपालिकेमध्ये याबाबत दराची माहिती मागविली असता माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच अभियंता यांचेकडून त्यांची निश्चिती करण्यात आली.

2.5 CuMt CNG Hopper Tipper Dumper वाहनांचे परिवहन विभागातील अभियंता यांचे मार्फत प्रमाणित करुन निश्चित केलेले दर सर्वात कमी असुन बाजारभावातील मागविलेल्या दरपत्रकाच्या तुलनेत कमी आहेत. तसेच सदर तक्त्यामधील वाहनांकरीता कामगार वगळुन आवश्यकते नुसार कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन घेणेस किंवा महानगरपालिकेकडील सफाई कर्मचारी देणेस व उर्वरीत दर निश्चित करुन प्रशासकीय मंजुरी करीता सदर दर निश्चित करणे आवश्यक वाटते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Description** | **Rate (Rs.)** |
|---|---|
| driver's expense | 1,067/- |
| CNG Expenses Maintenance, servicing, washing charges | 1150/- |
| RTO / Tax / Insurance and other charges | 100/- |
| Total cost per day / Per vehicle | 2,317/- |
| Profit 10% | 232/- |
| Rate Per day / per Vehicle | 2,549/- |
| 10 Vehicle Total Cost Amt Per day / per Vehicle | 25,490/- |
| **Cost of 10 Vehicles** | **93,03,850/-** |

उक्त कामास अंदाजित वार्षिक खर्च रु. 93,03,850/- खर्च आहे. सदर वाहने दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेकामी देणे आवश्यक असून सदर वाहनांवर अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मंजुरी आवश्यक आहे. दैनंदिन वॉर्ड साफसफाई कामी सद्यस्थितीत सुरु असलेल्या निविदेच्या वार्षिक अंदाजीत रक्कमेच्या तुलनेत सदर 2.5 CuMt CNG Hopper Tipper वाहनांचा वार्षिक खर्च अत्यंत कमी आहे. तसेच सदर वाहनांचे नव्याने निविदा मागविल्यास दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामात सुसुत्रता येणार नाही तसेच सदर कामाकरीता अतिरिक्त खर्च आल्यास तो द्यावा लागेल. त्यामुळे सद्यस्थितीत कार्यरत कंत्राटदार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. यांना वाहने दिल्यास कामे करणे योग्य होईल. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी मोठी कचरा वाहतुक वाहने कचरा संकलन करणे कामी जाऊ शकत नाही, अशा ठिकाणी सदर लहान वाहनामार्फत कचरा संकलन करणे कामी स्वच्छता निरिक्षक यांनी वाहनांची मागणी केली आहे.

सदर वाहने दैनंदिन सफाई व घनकचरा वाहतुक कामी कंत्राटी मजुर व वाहन पुरवठा करणेकामी मंजुर ठेकेदार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. यांच्या समवेत केलेल्या करारनाम्यामध्ये सदर वाहने अंतर्भुत नाहीत. त्यामुळे 2.5 CuMt CNG Hopper Tipper वाहने उक्त कंत्राटदारा समवेत केलेल्या करारनामाच्या अटीशर्तीमध्ये कोणताही बदल न करता सदर वाहनाचे दर व वाहने अंतर्भुत करून कंत्राटदारास नव्याने करारनामा करुन कार्यादेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 7 (संविदा) 73 (ई) नुसार या अधिनियमाची अंमलबजावणी करताना आयुक्त प्रसंगानुसार जी संविदा करावी लागेत अशा प्रत्येक संविदेस या कलमाच्या पूर्वगामी तरतुदी शक्यतोवर लागु होतील, आणि या कलमाच्या ज्या तरतुदी मुळ संविदेस लागू असतील त्या, अशा संविदेच्या कोणत्याही बदलास किंवा मुक्ततेस लागू होतील. असे नमुद आहे. सदर अधिनियमानुसार दर मंजुरीकरीता मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. मा. स्थायी समितीच्या मंजुरीकरीता गोषवारा सादर करणेस मा. आयुक्त यांनी दि.30/09/2026 रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी 2.5 CuMt CNG Hopper Tipper वाहनांकरीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार दरास मंजुरी मिळणेस, सदरचा वाहने सद्यास्थितीत दैनंदिन सफाई व घनकचरा वाहतुक कामी कंत्राटी मजुर व वाहन पुरवठा करणेकामी मंजुर ठेकेदार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना 06 वाहने व ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. यांना 04 वाहने देणेस तसेच त्यांच्या समवेत केलेल्या करारनामाच्या अटीशर्तीमध्ये कोणताही बदल न करता त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाच्या अंतिम मुदतीपर्यंत सदर वाहनांचे दर व वाहने अंतर्भुत करून या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस व त्यांच्या समवेत करारनामा करुन कार्यादेश देणेस मा. स्थायी समितीच्या मंजुरीकामी गोषवारा सविनय सादर.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

~~मा. महासभा~~ / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 04/10/2026 वेळ
रजिस्टर नोंद अ. क्र. 220 सन 2026-26
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\Nirthay Patil\Public Health\Raj Documents\STANDING GOSHVARA\2.5 CNG Hopper Tipper.docx

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शिक्षण विभाग**

**मा.स्थायी समिती सभा दि.१८/१० /2026**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र.१४४:-** मनपा क्रीडा विभाग अंतर्गत् कार्यरत क्रीडा शिक्षक यांना मुदतवाढ मिळणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर एकूण- 05 क्रीडा शिक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली असून मुदत वाढीचा कालावधी खालील नमूद केलेल्या तक्त्या प्रमाणे संपुष्टात आला आहे.

सदर कर्मचाऱ्यांची मुदत दि. 17/06/2026 रोजी संपुष्टात आली असल्याने तसेच संबंधित विभागांना सदर कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने नियुक्तीचे नविकरण करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | आदेश क्र. | मूळ नियुक्तीदिनांक | क्रीडा शिक्षिकचे नाव | पदनाम | एकूण वेतन (प्रति माहे) | नियुक्ती आदेश दिनांक | संपुष्ट दिनांक | तांत्रीक खंड दिनांक | नवनियुक्ती कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पासून | पर्यंत |
| 1 | 2432 | 09/01/2024 | श्री.विजय लुईस डिसोजा | क्रीडा शिक्षक | 35,000 | 18/12/2025 | 17/06/2026 | 18/06/2026 | 19/06/2026 | 18/12/2026 |
| 2 | 2432 | 09/01/2024 | श्री.अमोल बजरंग बरगाले | क्रीडा शिक्षक | 35,000 | 18/12/2025 | 17/06/2026 | 18/06/2026 | 19/06/2026 | 18/12/2026 |
| 3. | 2665 | 30/01/2024 | श्री. रामेश्वर भीमराव सास्ते | क्रीडा शिक्षक | 35,000 | 18/12/2025 | 17/06/2026 | 18/06/2026 | 19/06/2026 | 18/12/2026 |
| 4. | 1287 | 05/08/2024 | श्री. पुष्कर गणेश बारी | क्रीडा शिक्षक | 35,000 | 18/12/2025 | 17/06/2026 | 18/06/2026 | 19/06/2026 | 18/12/2026 |
| 5. | 1287 | 05/08/2024 | श्री. शंकर दामु चौधरी | क्रीडा शिक्षक | 35,000 | 18/12/2025 | 17/06/2026 | 18/06/2026 | 19/06/2026 | 18/12/2026 |

सदर एकुण 05 क्रीडा शिक्षक यांना पुढील 06 महीन्यांच्या कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत तसेच त्यांचे मानधन सन 2026-27 या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकामध्ये " ठोक मानधनावरील क्रिडा शिक्षकांचे मानधन/ काळजीवाहक यांचे / शिक्षक मानधन" या लेखाशीर्षमधून महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर एकूण 05 क्रीडा शिक्षक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून नियुक्ती दिनांकाचा पुढील 06 महिन्या करिता रु. 35,000/- प्रति माहे प्रमाणे एकुण खर्च रु.10,50,000 (अक्षर रु. दहा लाख पन्नास हजार मात्र) अपेक्षित आहे.

सदर कर्मचारी सद्यस्थितीत संबंधित विभागामध्ये हजर राहून कामकाज करत असल्याने त्यांना दि. 18/06/2026 रोजी तांत्रिक खंड देऊन दि.19/06/2026 ते दि.18/12/2026 पर्यंत 06 महिन्यांकरीता विभागाने केलेल्या शिफारशीनुसार मुदतीचे नविकरण करणेस तसेच त्यांच्या 06 महिन्याच्या मानधना करीता अंदाजित रक्कम रु. 10,50,000 (अक्षर रु. दहा लाख पन्नास हजार मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(कविता बोरकर)
**उप-आयुक्त (शिक्षण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. आयुक्त यांचे मान्यतेने.)**E-748418**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.३० / ०९/२०२६ वेळ ३-०३:०० वा
रजिस्टर नोंद अ. क्र. ११८ वर्ष २६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईं... ...पालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे
मा.स्थायी समिती सभा दि.१९/१०/२०२६

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. १४५ : महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांना वॉटर बॉटलचा (स्टेनलेस स्टील) पुरवठा करणेबाबत ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. (Tender ID- २०२६_ MBMC_३०५३१८८)**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांना पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी दि.०८/०४/२०२६ रोजीच्या जाहिर सुचनेनुसार ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने "दै. शिवमावळा व "दै आपले नवे शहर या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द देवुन दि.०९/०४/२०२६ ते दि.२३/०४/२०२६ या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आलेली होती.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०५ निविधारकांची Tender Bid दि.२७/०४/२०२६ रोजी उघडण्यात आली असता प्राप्त ०५ निविधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता पात्र १. केंद्रीय भांडार २. नवकार युनिफॉर्म या ०२ निविदाधारकांचा दराचा लिफाफा उघडण्यास मा.निविदा समितीने दि.१२/०५/२०२६ रोजी शिफारस केल्यानुसार दि.१८/०५/२०२६ रोजी दराचा लिफाफा उघडण्यात आलेला असुन त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | केंन्द्रीय भंडार | नवकार युनिफॉर्म | वाटाघाटी अंती दर |
|---|---|---|---|---|
| १. | Stainless steel minimum ५०० ML capacity (Single layer) drinking water bottles | २२४/-प्रति १नग | २१०/-प्रति १ नग | २०५/- प्रति १ नग |

उपरोक्त प्रमाणे मे.नवकार युनिफार्म यांची कमी दराची निविदा प्राप्त झालेली असुन सदर वाटाघाटी करुन कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. निविदा समितीने दि.२२/०९/२०२६ रोजी शिफारस केलेली आहे. सदरचा प्रस्तावास मा.आयुक्त सो. यांनी दि.२८/०९/२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी मे.नवकार युनिफॉर्म संस्था यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर हे सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षांकरिता निविदा स्विकारण्यास व करारनामा करुन कार्यादेश देण्यास व त्याकामी येण्याऱ्या खर्चास मा.स्थायी समितीस मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

Borkar 29/09/2026

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (शिक्षण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त सो.यांच्या मंजुरीने)

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**

**भाईंदर (प.) ता.जि.ठाणे**

**शिक्षण विभाग**

**मा. स्थायी समिती सभा दि. १८/१० /2026**

**// गोषवारा //**

**प्रकरण १४६ J P INFRA FOUNDATION मार्फत नवरघर शाळा संकुलातील महानगरपालिका शाळांमध्ये विकास प्रकल्प राबवणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत J P INFRA FOUNDATION यांच्या सहकार्याने नवरघर शाळा संकुलातील महानगरपालिका शाळांमध्ये विविध शैक्षणिक, क्रीडा, अंतर्गत व बाह्य उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदर प्रकल्पास मिरा भाईंदर महानगरपालिका CSR समितीची 29/07/2026 रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. प्रकल्पामध्ये नवघर शाळा संकुलातील महानगरपालिका शाळा क्र. 13 (मराठी माध्यम - तळमजला) व शाळा क्र. 29 (हिंदी माध्यम - पहिला मजला) यांचा समावेश असून, आवश्यकतेनुसार शैक्षणिक साहित्य, स्मार्ट बोर्ड, बाक (डेस्क), क्रीडा (इनडोअर/आउटडोअर) साहित्य, रंगकाम व अंतर्गत सुधारणा, तसेच इतर आवश्यक उपकरणे व उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सदर प्रकल्प पूर्णपणे J P INFRA FOUNDATION च्या CSR निधीतून राबविण्यात येणार असून महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता व देखभाल (AMC) तसेच संबंधित कर्मचारीविषयक जबाबदाऱ्या जसे शाळांमध्ये प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्व कर्मचारी ,प्रशिक्षक , समन्वयक , सहाय्यक कर्मचारी अथवा इतर मनुष्यबळाच्या नियुक्ती, वेतन, मानधन, भत्ते, प्रवास खर्च व्यवस्थापनाची व नियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी J P Infra Foundation ची राहील.

तरी, सदर उपक्रमामुळे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा व सहशालेय उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण

विकासास मदत होणार असल्याने, J P INFRA FOUNDATION यांच्या मार्फत सदर CSR प्रकल्प राबविणेकामी करारनामा (MOU) करून कार्यादेश देण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस निर्णयार्थ सादर.

**(कविता बोरकर)**
**उप-आयुक्त (शिक्षण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.०७/१० /२०२६ वेळ सायं.०६.००
रजिस्टर नोंद अ. क्र. ९२३ वर्ष २६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**आस्थापना विभाग**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा **दि. १९ / १० /2025**

**(गोषवारा)**

प्रकरण क्र. १४७ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात सेवाकरार पध्दतीने कार्यरत श्री.व्ही.आर.देशमुख, सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) यांच्या मुदतीचे नवीकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये श्री.व्ही.आर.देशमुख, सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) यांची दि.14/10/2024 रोजीच्या आदेशान्वये सेवाकरार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली असून दि.26/12/2024 रोजीच्या आदेशान्वये रु.89,500/- प्रती मासिक पारिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात आले आहेत.

श्री. व्ही.आर. देशमुख, सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) यांची मुदत दि.24/10/2025 रोजी संपुष्टात येत आहे. पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागातील शासन स्तरावरील पत्रव्यवहार, प्रस्ताव तयार करणे तसेच कार्यकारी अभियंता व उप-अभियंता यांच्या सुचनेनुसार विविध प्रस्ताव तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी सहाय्य करणे इत्यादी कामांसाठी अनुभवी अभियंत्यांची आवश्यकता असल्याने श्री.व्ही.आर.देशमुख यांना मुदतवाढ देणेबाबत पाणी पुरवठा विभागाने दि.04/09/2026 रोजी टिपणी सादर करुन शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात सेवाकरार पध्दतीने कार्यरत सेवानिवृत्त शाखा अभियंता श्री.व्ही.आर.देशमुख यांची मुदत दि.27/10/2026 रोजी संपुष्टात येत असल्याने दि.28/10/2026 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.29/10/2026 ते दि.28/10/2027 पर्यंत 01 वर्षाकरीता नियुक्तीस मुदतवाढ देणेस व श्री.व्ही.आर.देशमुख सेवानिवृत्त शाखा अभियंता यांचे वेतन अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षकातून अदा करण्यात येते, त्यांच्या वेतनाकरीता मासिक खर्च रु.89,500/- इतका असुन रु.10,74,000/- इतक्या वार्षिक होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस मा.आयुक्त महोदय यांनी दि.05/10/2026 रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात सेवाकरार पध्दतीने कार्यरत सेवानिवृत्त शाखा अभियंता श्री.व्ही.आर.देशमुख यांची मुदत दि.27/10/2026 रोजी संपुष्टात येत असल्याने दि.28/10/2026 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.29/10/2026 ते दि.28/10/2027 पर्यंत 01 वर्षाकरीता मुदतीचे नविकरण करणेस तसेच सदर सेवानिवृत्त शाखा अभियंता यांच्या वार्षिक वेतनाकरीता अंदाजित रक्कम रु.10,74,000/- (अक्षरी - दहा लाख चौऱ्याहत्तर हजार मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात सेवाकरार पध्दतीने कार्यरत श्री.व्ही.आर.देशमुख, सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य) यांच्या मुदतीचे नवीकरणाचा गोषवारा ठेवणेस शिफारस आहे.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. १९ / १० /२०२६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( १४८ )** आरक्षण क्र. २३० येथील धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार येथे 'धम्मचक्र प्रवर्तन दिन (दसरा)' कार्यक्रमासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत. **(E- 3471070)**

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रभाग कार्यालय क्र.०४ च्या कार्यक्षेत्रातील आरक्षण क्र. २३० येथील धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार सभागृह हे धम्मसम्राट अशोक बुद्धविहार व्यवस्थापन समिती यांना दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित 'धम्मचक्र प्रवर्तन दिन (दसरा)' उत्सवाच्या कार्यक्रमासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत संदर्भ क्र.१ अन्वये मा. महापौर महोदयांचे शिफारस पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

मा. महासभा दि.१३/०८/२०२६ ठराव क्र.५९ मधील धोरणानुसार विशेष बाब म्हणुन भाड्याने देताना भाड्यात ५०% पर्यंत सवलत देण्याचे किंवा नाममात्र भाड्याने सभागृहे भाड्याने देण्याचे अधिकार स्थायी समितीस राहतील. तरी सदर प्रस्तावाबाबत मा. स्थायी समिती सभेत निर्णय होणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PCB/DK/26-27/SG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १८ / १० /२०२६

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १४८ ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालय दुरुस्ती करणे. (पॅनल पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. (E- 3264047)**

| | | |
|---|---|---|
| १) | **वृत्तपत्र निविदा प्रसिध्द** | **दै. जागरुक टाईम्स, दै. दोपहर का सामना,<br>दै. जनतेचे जनमत दि.१६/०७/२०२६** |
| २) | **ऑनलाईन निविदा कालावधी** | **दि.१७/०७/२०२६ ते दि.२७/०७/२०२६<br>(निविदा सुचना क्र. १७)** |
| ३) | **लेखाशिर्षक** | सार्व.शौचालय व मुतारी देखभाल / दुरूस्ती व नुतनीकरण / साफसफाई (बांधकाम / आरोग्य) |
| ४) | **प्रशासकिय व आर्थिक मंजुरी** | मा. आयुक्त यांची दि.०४/०७/२०२६ ची प्रशासकिय मान्यता. |
| ५) | **मा. निविदा समिती शिफारस दिनांक** | दि.०३/०९/२०२६ |
| ६) | **मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक** | दि.०५/१०/२०२६ |

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | निविदाधारकांनी सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | 1318560_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालय दुरुस्ती करणे. (पॅनल पध्दतीने) | रु.४,२३,२२,९२६/- | **मे. एस.पी. इंजिनियरींग**<br>मे. स्पार्क सिव्हिल इंन्फ्रा प्रोजेक्टस् लि.<br>मे. साईबाबा कंस्ट्रक्शन<br>मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | **०.५१०० % कमी दराची**<br>अंदाजपत्रकिय दराने **दरवाटाघाटीनंतर ०.५१०० % कमी दराची**<br>अंदाजपत्रकिय दराने **दरवाटाघाटीनंतर ०.५१०० % कमी दराची**<br>१.००००% जास्त दराने |

सदरचे काम हे पॅनलद्वारे करावयाचे असल्याने तीन्ही निविदाधारकांना समान दराने काम करणे आवश्यक आहे. त्यानुसार वरील नमुद दरानुसार **१) मे. एस.पी. इंजिनियरींग २) मे. स्पार्क सिव्हिल इंन्फ्रा प्रोजेक्टस् लि. व ३) मे. साईबाबा कंस्ट्रक्शन** यांची **०.५१०० % कमी दराची** निविदा पॅनल पध्दतीने स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार वरील निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PCB/DK/26-27/SG-45

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १८ /१० /२०२६

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १५० )** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध वाहतुक सिग्नल यंत्रणा द्विवार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) (पॅनल पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. (E- 2948332)**

| | | |
|---|---|---|
| १) | **वृत्तपत्र निविदा प्रसिध्द** | दै. वृत्तमानस, दै. मुंबई लक्षद्विप,<br>दै. परशुराम समाचार दि.१६/०७/२०२६ |
| २) | **ऑनलाईन निविदा कालावधी** | दि.२०/०७/२०२६ ते दि.२८/०७/२०२६<br>(निविदा सुचना क्र. १६) |
| ३) | **लेखाशिर्षक** | सार्व.इमारती/सिग्नल/जनरेटर/लिफ्ट/कुलर/सौरदिवे/स्ट्रीट लाईट विदयुत देखभाल दुरुस्ती |
| ४) | **प्रशासकिय व आर्थिक मंजुरी** | मा. आयुक्त यांची दि.२६/०६/२०२६ ची प्रशासकिय मान्यता. |
| ५) | **मा. निविदा समिती शिफारस दिनांक** | दि.०१/१०/२०२६ |
| ६) | **मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक** | दि.०९/१०/२०२६ |

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | 1319562_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध वाहतुक सिग्नल यंत्रणा द्विवार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) (पॅनल पध्दतीने) | रु.१,३९,८३,०५१/- | **M/s. Nucleonics Traffic Solution Pvt. Ltd**<br>M/s. Miracle Electrical Solution India Pvt.Ltd. |

| **Description** | **Qty** | **Unit** | **M/s. Nucleonics Traffic Solution Pvt. Ltd** | M/s. Miracle Electrical Solution India Pvt.Ltd. |
|---|---|---|---|---|
| | | | **Rate** | |
| **Annexure-A** | | | | |
| Item no.1<br>Maitainence Work Off Traffic Signals in MBMC Area .(Comprehensive)Job per visit per singalRequirment and Compaint arised .including Man power and 4 wheeler vehical.<br>Job includes 1) Monthly servicing<br>2) on call repair<br>3) replacement of all spares within 24 hours<br>4) sending standby manpower for VIP movement.<br>The job include sheet metal work and plastic material with Electrical Parts<br>5) Providing Monthly Service report to Engineer Incharge<br>6) Providing Microprocessor based Automatic Traffic Signal Controller and Programming Work<br>7) Digital Count Down Timer<br>8)MS Junction Box | 1.00 | Job | Rs.16,500/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**Rs.16,500/-** | Rs.24,800/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9) Providing 300mmDia. Signal Head Body<br>10) Provide300 mmDia. All Retrofit Colour lamp<br>11) Providing All Software Programming work at Panel<br>12) Providing essential Rope/Cable at Required Site<br>13) Supplying & Laying HDPE pipe<br>14) Signal Trasportation work(MR) | | | | |
| Item no.2<br>Maitainence Work Off Traffic Solar Blinkers in MBMC Area .(Non Comprehensive)Job per visit as when per Requirment and Compain arised .including Man power and 4 wheeler vehical.<br>Job includes 1) Monthly servicing<br>2) on call repair<br>3) replacement of all spares within 24 hours<br>4) sending standby manpower for VIP movement.<br>The job include sheet metal work and plastic material with Electrical Parts<br>5) Providing Monthly Service report to Engineer Incharge<br>6) Providing Microprocessor based Automatic Traffic Signal Controller and Programming Work<br>7) Digital Count Down Timer<br>8)MS Junction Box<br>9) Providing 300mmDia. Signal Head Body<br>10) Provide300 mmDia. All Retrofit Colour lamp<br>11) Providing All Software Programming work at Panel<br>12) Providing essential Rope/Cable at Required Site<br>13) Supplying & Laying HDPE pipe<br>14) Signal Trasportation work(MR) | 1.00 | Job | Rs.1,875/-<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**Rs.1370/-** | Rs.2,900/- |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक **M/s. Nucleonics Traffic Solution Pvt. Ltd** यांची **वरील दराने** निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार वरील निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PC8/DK/26-27/SG-46

मा. ~~महासभा~~ / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.०८/१०/२०२६ वेळ दु ०१=२८ वा
रजिस्टर नोंद अ.क्र. ९२५ वर्ष २०२६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १९ / १० /२०२६

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १५१ )** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ मधील राजा शिवाजी विद्यालय शेजारील जागेत शौचालय बांधणे. (आमदार निधी) निविदेस मान्यता देणेबाबत. (E- २७९६९०२)**

| | | |
|---|---|---|
| १) | **वृत्तपत्र निविदा प्रसिध्द** | दै. सामना, दै. नवशक्ती, दै. आपल नवे शहर<br>दि.१६/०७/२०२६ |
| २) | **ऑनलाईन निविदा कालावधी** | दि.१७/०७/२०२६ ते दि.२७/०७/२०२६<br>(निविदा सुचना क्र. १५) |
| ३) | **लेखाशिर्षक** | आमदार निधी |
| ४) | **प्रशासकिय व आर्थिक मंजुरी** | जिल्हा नियोजन समिती, जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांची जावक क्र. जिनिस/०/२०२६/MAR/ Combine AA/०३६३४ दि.१७/०३/२०२६<br>मा. आयुक्त यांची दि.१२/१२/२०२५ ची प्रशासकिय मान्यता. |
| ५) | **मा. निविदा समिती शिफारस दिनांक** | दि.०८/१०/२०२६ |
| ६) | **मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक** | दि.१२/१०/२०२६ |

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | 1318488_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ मधील राजा शिवाजी विद्यालय शेजारील जागेत शौचालय बांधणे. (आमदार निधी) | रु.१२,७१,१८३/- | **मे. कृती इन्फ्रा.,**<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस | **अंदाजपत्रकिय दराने**<br>०.७५०० % जास्त दराने |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक **मे. कृती इन्फ्रा** यांची **अंदाजपत्रकिय दराने** निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार प्रस्ताव अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PCB/DK/26-27/SG-48

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १८ / १० /२०२६

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १५२ ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सार्व. इमारतीमधील सोलार पॉवर प्लांट द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) निविदेस मान्यता देणेबाबत. (E- 3202146)**

| | | |
|---|---|---|
| १) | **वृत्तपत्र निविदा प्रसिध्द** | दै. नालंदा एक्सप्रेस, दै. जनकल्याण सेवा दि.२६/०६/२०२६ |
| २) | **ऑनलाईन निविदा कालावधी** | दि.३०/०६/२०२६ ते दि.०८/०७/२०२६ (निविदा सुचना क्र. ०७) |
| ३) | **लेखाशिर्षक** | सार्वजनिक इमारती / उद्वाहके / सिग्नल यंत्रणा / वातानुकुलित यंत्रणा / जनरेटर |
| ४) | **प्रशासकिय व आर्थिक मंजुरी** | मा. आयुक्त यांची दि.०९/०६/२०२६ ची प्रशासकिय मान्यता. |
| ५) | **मा. निविदा समिती शिफारस दिनांक** | दि.०८/१०/२०२६ |
| ६) | **मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक** | दि.१२/१०/२०२६ |

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | 1312164_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सार्व. इमारतीमधील सोलार पॉवर प्लांट द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. (संपुर्ण कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने) | रु.३३,७९,२००/- | **मे. मधुराणी इंटरप्रायझेस,**<br>मे. ए.जी.एम. इंटरप्रायझेस,<br>मे. श्री सालासर कंस्ट्रक्शन कं.,<br>मे. एम.एम.जी. इंटरप्रायझेस |

| Description | Qty | Unit | M/s. Madhurani Enterprises | M/s.Shree Salasar Construction Company | M/s. AGM Enterprises | M/s.MMG Enterprises |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | | | |
| | | | | | | |
| ItemNo.1<br>Providing Repairing & Maintenance work of Solar power plant at various Places in MBMC Area. (Comprehensive work) including Servicing and cleaning 2 times in a month as per requirement and instructed by engineer incharge to maintain Solar power plant in working condition with All NecessaryConnector Wires, Inverter, Battery, UPS system, Electrical & Civil Work with require items as per instructed by Engineer incharge. (Fully Comprehensive work)<br>1) Monthly servicing<br>2) on call repair<br>3) replacement of all spares within 24 hours<br>4) The job include sheet metal work and | 1.00 | Job/ Month | **Rs.7,150/-**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**Rs.6,400/-** | Rs.5,53,760/- | Rs.33,79,200/- | Rs.33,93,350/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| plastic material with Electrical Parts<br>5) Battery Servicing<br>6) Battery Terminal Cleaning<br>7) UPS System Servicing<br>8) Solar panel Connecting Cables (MR) | | | | | | |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक **मे. मधुराणी इंटरप्रायझेस** यांची **वरील दराने** निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार वरील निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PC8/DK/26-27/SG-47

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १२/१०/२०२६ वेळ सका. ११.३०
रजिस्टर नोंद अ. क्र. १२८ वर्ष २६-२७
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि. १८ /१० /२०२६

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १५३ ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तन डंपीग ग्राऊंड येथे पाण्याच्या बोअरवेल पंपाकरीता विद्युत पुरवठा करणे कामाचे अवलोकन करणे. (E- ३२७०१९८)**

| | | |
|---|---|---|
| १) | **कोटेशन प्रसिध्द दिनांक** | दि.१५/०७/२०२६ |
| २) | **कोटेशन क्र.** | १८ |
| ३) | **मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक** | दि.२९/०९/२०२६ |

| अ. क्र | कोटेशन क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | १८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) उत्तन डंपीग ग्राऊंड येथे पाण्याच्या बोअरवेल पंपाकरीता विद्युत पुरवठा करणे. | रु. ६,८२,८३९/- | **मे. क्लासिक वर्क्स** | **१.०० % कमी दराने** |
| | | | | मे. रुद्र इनोटेक | २.०० % जास्त दराने |
| | | | | मे. युटिलिटी इंटरप्रायझेस | ०.५ % जास्त दराने |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक **मे. क्लासिक वर्क्स** यांची **१.००% कमी दराने** निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार प्रस्ताव अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PCB/DK/26-27/SG-44

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**ग्रंथालय विभाग**

**मा. स्थायी समिती सभा दि.१८/१०/2026**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( १५४ ) मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.**

**विषय :- मिरा भाईंदर महानरपालिकेच्या ग्रंथालय व अभ्यासिकेकरीता वाचनालय विकास / अभ्यासिका फर्निचर दुरुस्ती करणेबाबत**

| | | |
|---|---|---|
| **01** | **<u>कोटेशन निविदा कालावधी</u>** | **दि. 10/03/2026 ते दि. 09/03/2026 ( कोटेशन सुचना क्र.36)** |
| **02** | **लेखाशिर्ष** | **वाचनालय विकास / अभ्यासिका व फर्निचर दुरुस्ती** |
| **03** | **प्रशासकीय व आर्थिक मंजुरी** | **दि. 03/12/2024** |
| **04** | **मा. आयुक्त यांचो निविदा दरास मान्यता दिनांक** | **दि. 02/02/2026** |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरीता ग्रंथालय व अभ्यासिकेकरीता वाचनालय विकास / अभ्यासिका व फर्निचर दुरुस्ती करणेकामी | 999546/- | **1) मे. ज्योती प्रकाश इन्फ्रा सोल्युशन प्रा. लि.**<br>2) मे. अतुल संजय साळवी<br>3) मे. श्री कृपा इंटरप्राईजेस<br>4) मे. यमुना इंटरप्राईजेस | **769650.42**<br>828623.63<br>878896.80<br>967060.76 |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक मे. ज्योती प्रकाश इन्फ्रा सोल्युशन प्रा. लि यांची 23.00% कमी दराने निविदा जी.एस.टी.सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (ड) नुसार प्रस्ताव अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**(कविता बोरकर)**
**उप-आयुक्त, ग्रंथालय विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**